# शोषित, उपेक्षितांना न्याय देण्याचे काम डॉ. बाबासाहेबांनी केले- कैलास कणसे



पुणे, दि. १७- शोषित, उपेक्षितांना न्याय देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, असे प्रतिपादन बार्टीचे महासंचालक कैलास कणसे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बार्टीच्यावतीने सामाजीक समता सप्ताह कार्यक्रमाचा सांगता समारंभ व नॉलेज डे (ज्ञान दिवस) या कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून कणसे बोलत होते.

बार्टी मुख्यालय पुणे येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहूणे म्हणून आनंत कुमार ताकवाले (क्षेत्रिय पारपत्र अधिकारी) पुणे हे होते. डॉ. आंबेडकर वाद तत्व आणि व्यवहार या विषयावर डॉ.मुकेश दुपारे व जाती निमुर्लनाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य या विषयावर प्रा.राजू अडागळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रकल्प संचालक यांनी भीम गित सादर केले. समतादुत यांनी पथनाटय सादर केले.

प्रस्ताविक बार्टीच्या निबंधक सविता नलावडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रकल्प संचालक आरती डोळस यांनी केले. आभार प्रकल्प संचालक रूपाली आवळे यांनी मानले.